गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांना शिक्षा झाली व तुरुंगवास भोगावा लागला किंवा ज्यांना जखमा झाल्या आणि हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल व्हावे लागेल अशा स्वातंत्र्य सैनिकांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थीक सवलती देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओएस-१२८५/[३]/स्वा.सै. कक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : २२/१/१९८६.

पहा :- शासन निर्णय, क्रमांक:पीओएस-१०८५/गोमुस/स्वासैस/विक-१/स्वासै, दिनांक ३०-४-१९८५.

शासन निर्णय :-

गोवामुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांना शिक्षा झाली व तुरुंगवास भोगावा लागला किंवा ज्यांना जखमा झाल्या आणि हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल व्हावे लागले अशा स्वातंत्र्य सैनिकांना इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थिक सवलती देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, गोवामुक्ती संग्रामामध्ये भाग घेतलेल्या व महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या ज्या स्वातंत्र्य सैनिकांना शिक्षा झाली व तुरुंगवास भोगावा लागला किंवा ज्यांना जखमा झाल्या आणि हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल व्हावे लागले, अशा स्वातंत्र्य सैनिकांनी आवश्यक तो कागदोपत्री पुरावा सादर केल्यास दिनांक १ मे, १९८५ पासून इतर स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे पेन्शन व इतर आर्थिक सवलती त्यांना देण्यात याव्यात. सदरहू पेन्शनसाठी अर्ज अर्जदारानी जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्जाच्या ठराविक नमुन्यात करावयाचा आहे. अर्जाचा विहित नमूना जिल्हाधिका-यांच्या कार्यालयामध्ये मिळेल.

२. सदर बाबीवर होणारा खर्च, लेखाशीर्ष "२८८-सामाजिक सुरक्षा व कल्याण [ई] इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम -[सी], स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तींना निवृत्तीवेतन [मागणी क्र.१३]" या शीर्षाखाली केलेल्या आर्थिक तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनुमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:२०३४/व्यय-४, दिनांक ३.१२.१९८५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्रत,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अध्यक्ष व इतर सदस्य, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य २, नागपूर,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी, [अर्जाच्या विहित नमुन्यासह],
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निवासी लेखा-परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, ईएक्सपी-४, वित्त विभाग-सीईएन-५ [ ५ प्रतीसह],
सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक २५,
माहिती व जनसंपर्क संचालनालय [ प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी],
निवड फाईल,
x श्री. जयंतराव टिळक, सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद,
x श्री. पी. के. सावंत, सदस्य.

एमएसराजत.
४१२१९८५....

# गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांनी राज्य शासन पेन्शनसाठी करावयाच्या अर्जाचा नमूना

पासपोर्ट साईज
फोटो
चिकटविणे.

१. [अ] स्वातंत्र्य सैनिकाचे संपूर्ण नांव व पत्ता. :

[ब] स्वातंत्र्य सैनिक हयात नसेल तर त्यांच्या पत्नीचे नांव व संपूर्ण पत्ता. :

[क] स्वातंत्र्य सैनिकाची जन्मतारीख :

२. स्वातंत्र्य सैनिक महाराष्ट्र राज्यातील स्थायिक आहेत काय ? [असल्यास सक्षम अधिका-यांचे "अभिप्राय प्रमाणपत्र" यासोबत जोडावे]. :

३. गोवा मुक्ती संग्रामात भाग घेऊन केलेल्या कार्याचा तपशील :-

[अ] गोवा मुक्ती संग्रामात केलेल्या कार्याचे स्वरुप :-

१. सत्याग्रही :

२. संग्राम सैनिक :

३. संघटक :

४. जेथे कार्य केले त्या ठिकाणचे नांव. :

५. कोणत्या तारखेस/वर्षात काम केले. :

[ब] गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतल्यामुळे आपणांस शिक्षा झाली काय ? :
असल्यास, किती कालावधीसाठी तुरुंगवास भोगावा लागला ? [तुरुंगाधिका-याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.]

(क) गोवा मुक्ती संग्रामात आपणांस :
जखमा झाल्या होत्या काय ?
असल्यास, त्यासाठी आपण
कोणत्या इस्पतळात औषधोपचार
केले ? व किती काळ ?
(याच्या पुष्ठ्यर्थ इस्पतळाचा
दाखला जोडावा.)

प्रतिज्ञापत्र :-

मी याद्वारे प्रतिज्ञापन करतो की, माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे वरील माहिती सत्य आहे. तसेच याद्वारे मी आणखी असे प्रतिज्ञापन करतो की, जर मी दिलेली माहिती यानंतर खोटी किंवा चुकीची आहे असे आढळून आले तर त्यावेळे पर्यन्त वित्तीय सहाय्य म्हणून मला देण्यात आलेली रक्कम लेखी मागणी करण्यात आल्यावर तत्काळ परत देईन आणि जर असे करण्यात मी चुकलो तर ती रक्कम माझ्याकडून जमीन महसुलीची थकबाकी म्हणून वसूल करण्यात यावी.

अर्जदाराची स्वाक्षरी/
डाव्या हाताच्या
अंगठ्याची निशाणी.

दिनांक:-

टिप -"गोवा सत्याग्रही" म्हणजे ज्यांनी गोवा, नगर, हवेली, दीव व दमण इ. पोर्तुगीज प्रदेशासाठी सत्याग्रह केला ते असे समजावे.